क्रमांक : १९३९/क-१,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई
दिनांक : ३१ जानेवारी, २०२५.

**संदर्भ :-** १) सा.प्र.वि.शा.नि.क्र.एसआरव्ही-२०१८/प्र.क्र.१५९/कार्यासन १२, दि.१ ऑगस्ट, २०१९
२) या सचिवालयाचे ज्ञापन क्र.२२३९१/क-१, दि.१३ नोव्हेंबर, २०२४.

**:: कार्यालयीन आदेश ::**

या सचिवालयातील प्रधान सचिव आणि सचिव या पदावरील नियुक्ती महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (सेवाप्रवेश आणि सेवेच्या शर्ती) नियम, १९७३ मधील नियम ५ मध्ये नमूद केल्यानुसार करण्यात येते. या व्यतिरिक्त 'गट-अ' (राजपत्रित), 'गट-ब' (राजपत्रित) व (अराजपत्रित) तसेच 'गट-क' व 'गट-ड' संवर्गातील रिक्त असलेल्या पदांवर आवश्यक असणारी अर्हता धारण करणाऱ्या अधिकारी / कर्मचाऱ्यांना पदोन्नती / पदोन्नतीचा मानीव दिनांक देण्याबाबत संदर्भाधीन शासन निर्णयातील एकत्रित मार्गदर्शक तत्वे व या सचिवालयातील सेवाप्रवेश व सेवेच्या शर्ती यातील विहित नियमांनुसार नियुक्ती प्राधिकाऱ्यास शिफारस करण्याकरिता **विभागीय पदोन्नती समिती** या आदेशान्वये नव्याने गठीत करण्यात येत आहे. त्यानुसार विभागीय पदोन्नती समितीमधील सदस्य अधिकारी खालीलप्रमाणे राहतील :-

**विभागीय पदोन्नती समिती**

| **गट** | **विभागीय पदोन्नती समितीतील अधिकारी / सदस्य** | |
|---|---|---|
| 'गट-अ' (राजपत्रित), 'गट-ब' (राजपत्रित) व (अराजपत्रित) तसेच 'गट-क' व 'गट-ड' (६ व्या वेतन आयोगानुसार ज्या पदांचे ग्रेड वेतन रु.७५९९/- किंवा त्यापेक्षा कमी) | श्री. रविंद्र ग. जगदाळे, उप सचिव | अध्यक्ष |
| | श्री.उमेश श.शिंदे, उप सचिव | सदस्य |
| | श्री.विजय शं.कोमटवार, अवर सचिव | सदस्य |
| | कु.संगिता ल.विधाते, अवर सचिव (समिती) | सदस्य |
| | अवर सचिव/कक्ष अधिकारी (क-१ आस्थापना) | सदस्य सचिव |

..२/-

सदरहू विभागीय पदोन्नती समितीचे कार्यक्षेत्र :-

- **'गट-अ' (राजपत्रित), 'गट-ब' (राजपत्रित) व (अराजपत्रित) तसेच 'गट-क' व 'गट-ड' संवर्गातील रिक्त असलेल्या पदांवर आवश्यक असणारी अर्हता धारण करणाऱ्या अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या पदोन्नतीचे प्रस्ताव विचारात घेणे व संदर्भाधीन शासन निर्णयातील एकत्रित मार्गदर्शक तत्वे व या सचिवालयातील सेवाप्रवेश व सेवेच्या शर्ती यातील विहित नियमांनुसार पदोन्नतीसाठी पात्र अधिकारी / कर्मचाऱ्यांची निवडसूची तयार करुन नियुक्ती प्राधिकाऱ्यास पदोन्नतीसाठी शिफारस करणे.**
- **मानीव दिनांकाचे प्रस्ताव विचारात घेणे व सेवा प्रवेश नियमाच्या तरतुदीनुसार व सामान्य प्रशासन विभागाने वेळोवेळी निर्गमित केलेले आदेश/मार्गदर्शक सूचना विचारात घेवून पदोन्नतीचा मानीव दिनांक देण्यासाठी नियुक्ती प्राधिकाऱ्यास शिफारस करणे.**
- **विभागीय पदोन्नती समितीच्या निवड सूचीच्या व अहवालाच्या अनुषंगाने विविध संवर्गातील पदोन्नती / मानीव दिनांक देण्यासंदर्भातील प्रस्ताव "क-१ (आस्थापना)" कक्षामार्फत नियुक्ती प्राधिकारी यांच्या अंतिम निर्णयार्थ सादर करण्यात येतील.**

आदेशानुसार,

**(सुभाष नलावडे)**
उप सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

**प्रति,**

१) मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव
२) मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव
३) सचिव-१ (का.), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय
४) सचिव-२ (का.), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय
५) विभागीय पदोन्नती समितीमधील अधिकारी/सदस्य
६) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी / कर्मचारी.
७) 'क-२' (संगणक) कक्ष, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (सदरहू आदेश या सचिवालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावा.)
८) निवडसूची